महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ ११ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १९६ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## लाडकी बहीण योजनेबाबत महिलांसाठी आनंदाची बातमी



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : ज्या कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांच्या आत आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारने लाडकी बहीण ही योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत लाडक्या बहिणींना दर महिन्याला दीड हजार रुपये दिले जातात. विधानसभा निवडणुकीपूर्वी ही योजना सुरू केली होती, या योजनेचा महायुतीला विधानसभा निवडणुकीत मोठा फायदा झाल्याचं पहायला मिळालं. दरम्यान राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचं वार वाहत आहे, आधी नगर परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणुका झाल्या, या निवडणुकांची आचारसंहिता आणि त्यानंतर लगेचच निवडणूक आयोगाकडून महापालिका निवडणुकांची घोषणा करण्यात आली होती, त्यामुळे महापालिका निवडणुकीची आचारसंहिता यामुळे या योजनेतील पैशांना ब्रेक लागला होता, तरी देखील सरकारने मध्यंतरी नोव्हेंबरचा हाफ्ता लाभार्थी महिलांना वितरीत केला, मात्र डिसेंबर आणि जानेवारीचा हाप्ता कधी मिळणार याकडे आता लाभार्थी महिलांचं लक्ष लागलं आहे.

दरम्यान सूत्रांकडून मिळत असलेल्या माहितीनुसार आता या योजनेतील लाभार्थी महिलांची सक्रांत गोड होणार आहे. येत्या चार ते पाच दिवसांमध्ये लाडक्या बहिणींना डिसेंबर आणि जानेवारी अशा दोनही महिन्याचे पैसे एकत्र मिळण्याची शक्यता आहे. लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात 14 किंवा 15 जानेवारी रोजी तीन हजार रुपये जमा होण्याची शक्यता आहे, अशी माहिती समोर येत आहे. मात्र या माहितीला अद्याप सरकारकडून कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाहीये.

**विरोधकांकडून आक्षेप**

दरम्यान लाडकी बहीण योजनेचा डिसेंबर आणि जानेवारीचा हाफ्ता मकर सक्रांतीपूर्वी मिळणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे, याबाबत अद्याप सरकारकडून कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही, मात्र 15 जानेवारी रोजी महापालिका निवडणुकीचं मतदान असल्यानं या पार्श्वभूमीवर विरोधकांनी यावर आक्षेप घेतला आहे, जर लाभार्थी महिलांना निधीचं वितरण झालं तर हा आचारसंहितेचा भंग होईल असं विरोधकांनी म्हटलं आहे. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये आता लाभार्थी महिलांना मकरसंक्रांतीपूर्वी पैसे मिळणार की? निवडणुका झाल्यावर पैसे बँक खात्यात जमा होणार हे पहाणं महत्वाचं ठरणार आहे.

## बेकायदेशीर परदेशी वास्तव्यावर कडक कारवाई

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पनवेल** : नवी मुंबईत बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांविरोधात पोलिसांनी कारवाईचा वेग वाढवला असून, त्यांना आश्रय देणाऱ्या खोलीमालकांवर थेट गुन्हे दाखल करण्याची भूमिका घेतली आहे. शुक्रवारी एकाच दिवशी तळोजा आणि खारघर या दोन वेगवेगळया पोलीस ठाण्यांच्या हद्दीत परदेशी नागरिकांची माहिती लपविल्याप्रकरणी खोलीमालकांविरोधात गुन्हे नोंदवण्यात आले. या कारवाईमुळे बेकायदेशीर वास्तव्य करणारे परदेशी नागरिक तसेच त्यांना आश्रय देणाऱ्या मालकांचे धाबे दणाणले आहेत.

परदेशी नागरिक कायदा १९४६ मधील कलम १४ (क) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सेक्टर १० मधील पार्वती हाइट्स या इमारतीत शुक्रवारी सकाळी सात वाजता करण्यात आलेल्या तपासणीत ही बाब उघडकीस आली. इमारतीतील खोली क्रमांक ५०१ मध्ये ३५ आणि ४२ वर्षांचे दोन परदेशी नागरिक वास्तव्यास असल्याचे आढळले. या नागरिकांना भाडेकरू म्हणून ठेवताना खोलीमालकाने केंद्र सरकारच्या परदेशी नागरिकांसाठी असलेल्या संकेतस्थळावर सी-फॉर्मद्वारे नोंदणी न केल्याचे तपासात स्पष्ट झाले. त्यामुळे खोलीमालकाने बेकायदेशीर आश्रय देण्यास मदत केल्याचा ठपका ठेवत पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.




## अजित पवार यांच्या आश्वासनानंतर बस-मेट्रो मोफत करण्याची मागणी





**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई : महापालिकेत सत्तेत आल्यास पुणे-पिंपरी चिंचवडमधील नागरिकांना मोफत बस आणि मेट्रो प्रवास सुविधेचे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, नागपूरमधील नागरिकांनाही मोफत मेट्रो व बस प्रवास सुविधा देण्याची मागणी विरोधकांनी केली आहे. मात्र या मोफतचा भार राज्य शासनाने उचलावा, अशीही पुस्ती जोडली आहे.**

पुणे व पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना मोफत बस व मेट्रो प्रवास सुविधा देण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी जाहीरनाम्यात दिले आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून दररोज ७०-८० लाख नागरिक उपनगरी गाड्यांमधून प्रवास करतात, तर सुमारे २५ लाख मुंबईकर बेस्टने प्रवास करतात. मेट्रोनेही दररोज ९-१० लाख मुंबईकर प्रवास करतात. तरीही मुंबईत लाखो खासगी वाहने रस्त्यावर असून प्रदूषण आणि वाहतूक कोंडीची समस्या मोठी आहे. अधिकाधिक नागरिकांनी मेट्रो, बस, लोकल अशा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतून प्रवास | करावा, यासाठी ही सेवा मोफत देण्याची मागणी सुरु झाली आहे.

अजित पवार हे राज्याचे अर्थमंत्री असून त्यांनी पुणे, पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांसाठी मोफत बस व मेट्रो प्रवासाचे आश्वासन दिले आहे. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नागपूर आदी शहरांमधील नागरिकांवर अन्याय न करता त्यांच्यासाठीही आर्थिक भार उचलून मोफत बस व मेट्रो प्रवास सुविधा उपलब्ध करुन द्यावी. या मोफतच्या खर्चाचा भार सरकारने उचरावा, अशी मागणी शिवसेना (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी केली आहे..

मुंबईतील मेट्रो व बेस्टमध्ये मोफत प्रवासाची सुविधा देण्याचा सध्या तरी कोणताही प्रस्ताव नाही. अजित पवार यांनी पुणे, पिंपरी-चिंचवडसाठी मोफत मेट्रो व बस प्रवासाचे आश्वासन दिले असले तरी हा अधिकार महापालिकेला नाही. मेट्रोमध्ये केंद्र सरकारचाही निम्मा वाटा आहे. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारच्या परवानगीशिवाय कोणताही मोफत प्रवासाचा निर्णय घेता येणार नाही. केंद्र सरकारने आर्थिक मदत व परवानगी दिली, तर मुंबईसह अन्य शहरांमध्ये मोफत बस व मेट्रो प्रवास सुविधा देता येऊ शकेल, असे मत शिवसेनेचे (शिंदे) माजी खासदार राहुल शेवाळे यांनी व्यक्त केले.

मोफत मेट्रो व बस प्रवासाची सुविधा मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, नागपूर आदी शहरांमधील नागरिकांवर अन्याय न करता त्यांच्यासाठीही मोफत प्रवास सुविधा जाहीर करावी, अशी मागणी अ. भा. काँग्रेसचे सचिव सचिन सावंत यांनी केली. त्यासाठी राज्य सरकारने आर्थिक मदत करावी. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक बळकट करणे आवश्यक असून अधिकाधिक नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर केल्यास वाहतूक व प्रदूषणाचा प्रश्न सुटण्यास मदत होईल, असे मत सावंत यांनी व्यक्त केले.

## श्रीकांत शिंदे यांचा भाजपला चेकमेट

### महापालिका राजकारणात शिवसेनेचा डाव यशस्वी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**अंबरनाथ :** अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीनंतर शहरात शिवसेना, भाजप यांच्यात रोज चेकमेट सुरु असताना शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या राजकीय खेळीने शुक्रवारी भाजपचा सत्तेचा डाव उधळला आहे. तर भाजपसोबत गेलेल्या राष्ट्रवादीने ऐनवेळी शिवसेनेला पाठिंबा देत उपनगराध्यक्षपद पदरात पाडून घेतले आहे. त्यामुळे संख्याबळाच्या खेळात भाजपला धक्का बसला आहे. तर सत्तेच्या लालसेपोटी धरसोड वृत्ती करणाऱ्या निलंबित काँग्रेस नगरसेवकांची चांगलीच कोंडी झाली आहे. सोमवारी होणाऱ्या पहिल्या सभेपूर्वीच्या ७२ तासात भाजप काय खेळी खेळते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीच्या घोषणेपासूनच ही निवडणूक राज्यभर वादात आणि चर्चेत राहिली आहे. त्यात निवडणूक निकालानंतर भाजपने नगराध्यक्षपद मिळवले. मात्र सत्ता स्थापनेसाठी युतीतील मित्रपक्ष शिवसेनेला विश्वासात न घेता थेट काँग्रेससोबत युती करण्याचा निर्णय घेत, भाजप आणि मुख्यमंत्र्यांनाच ऐन निवडणुकीत अडचणीत आणले. त्यामुळे भाजप, काँग्रेस युतीवरून संतापलेल्या मुख्यमंत्री फडणवीस यांनी काँग्रेससोबत युती रद्द करण्याचे आदेश देत स्थानिक भाजप नेतृत्वाला झापले. मात्र या राजकारणात प्रदेश काँग्रेसच्या वरिष्ठांनी भाजपसोबत युती केल्यावरून काँग्रेसच्या १२ नगरसेवकांना पक्षातून निलंबित केले. या संधीचा लाभ घेत भाजपने सर्व निलंबित नगरसेकांचा भाजपमध्ये पक्ष प्रवेश करून घेत संख्याबळ साधत शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्याची खेळी केली. मात्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी शुक्रवारी राजकीय खेळी करत थेट अंबरनाथ राष्ट्रवादीच्या ४ नगरसेवकांच्या गटाला गळाला लावले. त्यामुळे संख्याबळाच्या खेळात शिवसेनेचे २८ आणि राष्ट्रवादी ४ असे ३२ नगरसेवकांचे बहुमताचे संख्याबळ झाले आहे. तर भाजप १५ आणि निलंबन काँग्रेस नगरसेवक १२ असे २७ च्या आकडेवारीने भाजप अल्पमतात आले आहे. त्यामुळे नगरपालिकेत वाढीव स्वीकृत नगरसेवक, उपनगराध्यक्ष पद आणि सात समित्यांसह सत्तेतील महत्वाचा वाटा शिवसेनेकडे आला आहे. त्यामुळे भाजप आणि विशेषतः निलंबत काँग्रेसच्या १२ नगरसेवकांना धक्का बसला असून शहरातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

## केडीएमसी निवडणुकीसाठी ३११ कर्मचा-यांनी बजावला टपाली मतदानाचा हक्क

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण : सार्वत्रिक निवडणूकीत निवडणूक कर्तव्यावर अधिकारी कर्मचारी वर्गास आपला मतदानाचा हक्क बजावता यावा याकरिता महापालिकेने टपाली मतदानाची सुविधा दि. ९,१० व ११ जानेवारी रोजी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन दिलेली आहे.**

महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी दि.१५ जानेवारी रोजी मतदान व दि.१६ जानेवारी मतमोजणीची प्रकिया पार पाडणार आहे. या प्रक्रियेसाठी मोठया प्रमाणावर अधिकारी कर्मचा-यांची नेमणूक निवडणूक कामासाठी करण्यात आली आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीत मतदार म्हणून नोंदणी असणारे मात्र कल्याण डोंबिवली महापालिकेमधे अथवा अन्यत्र निवडणूक कर्तव्यावर नियुक्त असणारे अधिकारी कर्मचारी यांना १५ जानेवारी रोजी प्रत्यक्ष उपस्थित राहून मतदान करणे शक्य होणार नसल्याने त्यांच्याकरिता कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने आपल्या हद्दीतील सर्व ९ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ९, १० व ११ जानेवारी २०२६ रोजी "विशेष टपाली मतदान सहायता कक्ष" स्थापन केले आहेत.

या दिवशी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या कालावधीत सदर कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहून मतदान करू शकतील यासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे. या सुविधेत दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी दिवसभरात ३११ अधिकारी कर्मचा-यांनी टपाली मतदानाचा हक्क बजावला असल्याची माहिती टपाली मतदानाचे समन्वय अधिकारी विजयकुमार द्रासे यांनी दिली आहे.

## पालिका निवडणुकीत शेवटच्या रविवारी घरोघरी प्रचाराचा धुराळा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना त्यांचा प्रचार करण्यासाठी अवघे दहा दिवसच मिळाले. त्या दहा दिवसात केवळ दोनच रविवार उमेदवारांच्या हाती लागले. आज शेवटचा रविवार असल्याने कल्याण डोंबिवलीत बहुतांश मतदार नोकरदार वर्ग असल्याने नोकरदार मतदारांना रविवारी सुट्टी असल्याने मतदारांना भेटण्यासाठी सर्वच उमेदवारांनी नियोजन केल्याने दिवसभर मतदारांची गाठीभेट घेण्यावर भर घातला जाणार असल्याने रविवारचा दिवस प्रचाराचा धुमाकुळ घालणारा सुपर संडे ठरणार आहे.

महापालिका निवडणूकीत काही उमेदवारांनी एआयचा आधार घेत त्यांनी केलेल्या प्रचाराच्या कामांचे व्हीडीओ तयार करुन ते सोशल मिडियावर टाकले आहेत. या निवडणूकीत प्रचारासाठी प्रथमच एआय तंत्रज्ञानाचा वापर केला गेला. त्याचबरोबर फेसबूक, व्हाटसअप ग्रुप आणि इन्स्टाग्रामवर व्हिडीओ टाकून प्रचार केला जात आहे. महापालिका निवडणूकत घरोघरी जाऊन मतदारांच्या भेटीगाठी घेण्यावर जास्त भर दिला जात आहे. अन्य प्रचार तंत्रापेक्षा घरोघरी जाऊन भेटी देताना सुट्टीचा दिवस गाठला जात आहे. प्रचाराच्या अंतिम चरणात मतदारांच्या घरी जाऊन उमेदवार आम्हाला निवडून द्या असे आवाहन करीत आहे. प्रचाराचा हा रविवार सुपर संडे ठरणार आहे. सुट्टीच्या दिवशी मतदार घरी असतात. त्याना उमेदवार गाठतात. त्यामुळे प्रचाराचा शेवटचा रविवार सर्वत्रच प्रचार फेऱ्यानी धुमाकुळ घालणारा असणार आहे.

## आयोगाच्या मताधिकार ॲपचा ठाण्यात प्रसार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे:** लोकशाही अधिक सक्षम, पारदर्शक आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी सुलभ व्हावी, या उद्देशाने राज्य निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या निवडणूक मताधिकार ॲपचा व्यापक प्रसार शुक्रवारी नौपाडा प्रभाग समितीत करण्यात आला.

नौपाडा प्रभाग समितीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेअंतर्गत घराघरांत जाऊन मार्गदर्शन, चौक-चौकांत माहिती फलक, बॅनर, पोस्टर तसेच प्रात्यक्षिकांद्वारे ॲप डाउनलोड व वापराचे प्रशिक्षण दिले जात आहे.

**नागरिकांशी साधला संवाद**

खारकर आळी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड आणि विकास प्लम या परिसरात गाडी फिरून भोंग्याद्वारे मताधिकार ॲपचा प्रसार करत होती. शिक्षिका चंद्रिका पालन स्वीप टीमला सोबत एकत्रितपणे नागरिकांशी संवाद साथत असून, "प्रत्येक मत महत्त्वाचे आहे" हा संदेश प्रभावीपणे पोहोचवत आहेत. स्थानिक नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले असून, अनेकांनी ॲपमुळे मतदानासंदर्भातील संभ्रम दूर झाल्याची भावना व्यक्त केली आहे. "पूर्वी माहिती मिळवण्यासाठी विविध ठिकाणी चौकशी करावी लागत होती, आता सर्व माहिती मोबाइलवर मिळते, असे नागरिकांनी सांगितले.

## 'बिनविरोध' प्रभागांत मतदान सक्तीची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : पालिका निवडणुकांमध्ये उमेदवार बिनविरोध निवडून देताना मतदान प्रक्रिया राबविली जात नसल्याच्या पद्धतीला आव्हान देत सामाजिक कार्यकर्ते अजय जेया यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. एकच उमेदवार शिल्लक राहिला तरीही मतदान व मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश निवडणूक आयोगाला देण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

ठाणे पालिकेतील प्रभाग क्रमांक ५(अ), १४(अ), १७ (ब), १८ (ब), १८ (क) आणि १८ (ड) या सहा प्रभागांमध्ये नामनिर्देशनपत्रांची छाननी झाल्यानंतर इतर सर्व उमेदवारांनी माघार घेतल्याने उर्वरित उमेदवारांना मतदान न घेता बिनविरोध निवडून जाहीर करण्यात आले. यामुळे मतदारांचा 'नोटा' या पर्यायाद्वारे असहमती नोंदविण्याचा घटनात्मक अधिकार हिरावला जात असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. याचिकाकर्त्यांच्या मते, नोटा पर्यायामुळे 'बिनविरोध निवडणूक' ही संकल्पनाच बदलली असून, एकच उमेदवार असला तरी मतदारांना नोटा निवडण्याचा अधिकार आहे. नोटाला अधिक मते मिळाल्यास नव्याने निवडणूक घेण्याची गरज होऊ शकते.

## तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत अंबर्जे शाळेचा ऐतिहासिक विजय



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर :** दि.३० डिसेंबर २०२५ वार मंगळवार रोजी शहापूर तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा गोठेघर वाफे आश्रमशाळा येथील मैदानावर पार पडल्या. यात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,अंबर्जे केंद्र-शेरे,शाळेतील खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर कबड्डी व खोखो मुले व मुली च्या संघाने खेळात अजिंक्यपद प्राप्त केले. विशेष म्हणजे अंबर्जे शाळेच्या मुलांचा व मुलींचे कबड्डी खेळाच्या संघाची या वर्षी हॅट्रिक केली तर खो खो च्या खेळाडूंचे विजयाचे दुसरे वर्ष आहे. असा पराक्रम करणारी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,अंबर्जे ही पहिलीच शाळा आहे. त्यांच्या या अभूतपूर्व यशाबद्दल तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी श्री.हिराजी वेखंडे,बीटविस्तार अधिकारी सौ.संगिता माळी, केंद्रप्रमुख श्री.डॉ.शरद सपकाळे तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. विलास साबळे यांनी विशेष अभिनंदन केले. खेळाडूंना मैदानावर प्रोत्साहन देण्यासाठी यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.गणेश परटोले,पोलीस पाटील श्री.हरिश्चंद्र परटोले, श्री.कृष्णा भोईर,श्री.गणेश परटोले, श्री.रविंद्र परटोले आदि सदस्य उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल गावकऱ्यांनी फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला.

# सिकलसेल ॲनिमिया : ओळख, प्रतिबंध आणि निर्मूलनाकडे वाटचाल

## सिकलसेल विशेष मोहीम : 15 जानेवारी ते 7 फेब्रुवारी 2026

सिकलसेल ॲनिमिया हा एक गंभीर, दीर्घकालीन आणि अनुवंशिक रक्तविकार असून तो केवळ वैयक्तिक आरोग्याचा प्रश्न नसून एक व्यापक सामाजिक आणि सार्वजनिक आरोग्य समस्या आहे. योग्य वेळी निदान, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि व्यापक जनजागृतीच्या माध्यमातून या आजारावर नियंत्रण मिळवणे शक्य आहे. याच उद्देशाने भारत सरकारने सन २०४७ पर्यंत सिकलसेल मुक्त भारत घडवण्याचे ध्येय निश्चित केले असून, त्याच अनुषंगाने महाराष्ट्र शासनामार्फत १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत सिकलसेल तपासणी विशेष अभियान पंधरवडा राबविण्यात येत आहे.

**सिकलसेल आजाराचे स्वरूप आणि महाराष्ट्रातील स्थिती**

सामान्य परिस्थितीत लाल रक्तपेशी गोलाकार व लवचिक असतात. त्या रक्तवाहिन्यांमधून सहज प्रवास करून शरीराच्या प्रत्येक भागाला ऑक्सिजन पोहोचवतात. मात्र सिकलसेल ॲनिमियामध्ये या पेशी चंद्रकोरीसारख्या (विळ्याच्या) आकाराच्या, कडक व चिकट बनतात. परिणामी या पेशी रक्तवाहिन्यांमध्ये अडकून ऑक्सिजनचा प्रवाह अडवतात आणि वेदनादायक व जीवघेण्या गुंतागुंती निर्माण होतात.

भारतामध्ये सिकलसेल रुग्णसंख्येत जगात दुसरा क्रमांक असून सुमारे १ कोटी



८० लाख लोकांमध्ये सिकलसेलची लक्षणे, तर १४ लाखांहून अधिक लोक प्रत्यक्ष रुग्ण आहेत. महाराष्ट्रात ही स्थिती काहीशी गंभीर असून देशातील सुमारे १५ टक्क्यांहून अधिक सिकलसेल रुग्ण राज्यात आढळतात. २०१९ ते २०२५ या कालावधीत राज्यात १२,४२० सिकलसेल रुग्ण आणि १,२४,२७५ वाहक (Carrier) आढळून आले आहेत.

ठाणे जिल्ह्यात २०२१ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत ४,५३,४०३ व्यक्तींची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये १,०३५ वाहक व ३७ रुग्ण आढळले आहेत. २००९ पासून आजअखेर जिल्ह्यात एकूण ११४ सिकलसेलग्रस्त रुग्ण नोंदविण्यात आले आहेत. प्रामुख्याने आदिवासी समाज व काही विशिष्ट समुदायांमध्ये या आजाराचे प्रमाण अधिक आढळते.

**अनुवंशिकता आणि विवाहपूर्व तपासणीचे महत्त्व**

सिकलसेल हा आजार संसर्गजन्य नसून अनुवंशिक आहे. म्हणजेच तो पालकांकडून मुलांमध्ये जनुकांद्वारे येतो. विशेषतः रक्तसंबंधीय विवाह (चुलत-मामे भावंडांतील विवाह) या आजाराच्या प्रसाराला कारणीभूत ठरतात.

**सिकलसेलचे दोन प्रकार आहेत –**

वाहक (AS) – स्वतः निरोगी, पण पुढील पिढीला आजार देऊ शकतात

रुग्ण (SS) – गंभीर लक्षणांनी ग्रस्त

जर दोन्ही पालक वाहक असतील, तर अपत्य सिकलसेल रुग्ण होण्याची शक्यता २५ टक्के असते. त्यामुळे विवाहापूर्वी सिकलसेल तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. शासनामार्फत पांढरे (निरोगी), पिवळे (वाहक) आणि लाल (रुग्ण) अशी रंगीत कार्ड प्रणाली सुरू करण्यात आली आहे.

बालकांमधील लक्षणे आणि वाढीवरील परिणाम सिकलसेलची लक्षणे सहसा बाळ ६ महिन्यांच्या बाळाला सुद्धा दिसू शकतात. हात-पायांच्या बोटांना सूज येणे, तीव्र वेदना, सतत थकवा, वजन न वाढणे, वारंवार संसर्ग होणे ही प्रमुख लक्षणे आहेत. न्यूमोनिया, मेनिंजायटीस यांसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. वेळेवर रक्त तपासणी (HPLC / Electrophoresis) केल्यास योग्य उपचार शक्य होतात.

**सिकलसेल क्रायसिस आणि अवयवांवरील परिणाम**

'सिकलसेल क्रायसिस' ही या आजारातील सर्वात धोकादायक अवस्था आहे. रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा आल्याने छाती, हाडे, पाठ, सांधे यामध्ये तीव्र वेदना होतात. याचा परिणाम –

- मेंदू : लहान वयात स्ट्रोक
- फुफ्फुसे : ॲक्यूट चेस्ट सिंड्रोम
- मूत्रपिंड, डोळे, यकृत, पित्ताशय यांवर गंभीर परिणाम

वारंवार क्रायसिस झाल्यास मृत्यूचा धोका संभवतो.

**२०४७ निर्मूलन लक्ष्य आणि महाराष्ट्राचे विशेष अभियान**

भारत सरकारचे उद्दिष्ट २०४७ पर्यंत सिकलसेल निर्मूलन हे आहे. त्यासाठी देशभर ७ कोटी लोकांचे स्क्रीनिंग केले जाणार आहे. महाराष्ट्रातील २१ जिल्ह्यांमध्ये हे अभियान प्रभावीपणे राबवले जात आहे.

१५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या सिकलसेल तपासणी विशेष पंधरवड्यात मोफत तपासणी, औषधोपचार, समुपदेशन, गरोदर मातांची विशेष तपासणी या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**उपचार आणि औषधोपचार**

सिकलसेलवर कायमस्वरूपी इलाज नसला, तरी हायड्रॉक्स्युरिया हे प्रभावी औषध आहे. यामुळे वेदनादायक झटके ५०% पर्यंत कमी होतात. फॉलिक ॲसिड, आवश्यकतेनुसार रक्त संक्रमण आणि नियमित वैद्यकीय देखरेख महत्त्वाची आहे. बनावट उपचारांपासून दूर राहणे आवश्यक आहे.

**तपासणी, समुपदेशन आणि जीवनशैली**

लवकर निदान हेच प्रभावी नियंत्रणाचे साधन आहे. तपासणीनंतर समुपदेशन अत्यावश्यक असून, योग्य विवाह निर्णय व गर्भधारणेतील काळजी यामुळे पुढील पिढी वाचवता येते.

भरपूर पाणी पिणे, संतुलित आहार, अति उष्णता-थंडी टाळणे, हलका व्यायाम, धूम्रपान टाळणे आणि सकारात्मक मानसिकता या गोष्टी रुग्णांचे जीवनमान सुधारतात.

शासकीय योजना आणि सामाजिक दायित्व महाराष्ट्र शासनामार्फत संजय गांधी निराधार योजना, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सवलती, एसटी प्रवास सवलत, विविध सामाजिक व आरोग्य योजना राबविण्यात येत आहेत.

सिकलसेल निर्मूलन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. तपासणी करून घेणे, जनजागृती करणे आणि योग्य निर्णय घेणे हेच सिकलसेलमुक्त भारताकडे जाण्याचे खरे पाऊल आहे.

चला, सिकलसेल निर्मूलनाच्या या राष्ट्रीय मोहिमेत आपण सर्वजण सहभागी होऊया.

आज तपासणी – उद्याचे निरोगी भविष्य!

**संजय प्रभाकर जाधव**
**जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी**
**जिल्हा परिषद ठाणे,आरोग्य विभाग**

## श्री क्षेत्र गंगा गोरजेश्वर मढ ते त्र्यंबकेश्वर पायी दिंडीचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण ग्रामीण :** श्री क्षेत्र गोरजेश्वर मढ ते त्र्यंबकेश्वर पायी दिंडीचे शुक्रवार दिनांक ९जानेवारी २०२६ ते १५ जानेवारी २०२६ पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी श्री संत निवृत्तीनाथ महाराज वारकरी संप्रदाय ट्रस्ट मढ ता.शहापुर येथे पायी दिंडीचे आयोजन करण्यात येणार आहे.योगी फुलनाथ महाराज ( टाकेश्वर -मठाधिपती ),योगी आकाशनाथ बाबा ( श्री क्षेत्र गोजरेश्वर मढ-मठाधीपती ) वै.बाबु महाराज जाधव ( फळेगांव) गुरुवर्य ह.भ.प.त्रिंबक महाराज ठाणगांवकर ( सिन्नर ) ह.भ.प.मंगल महाराज बांगर ( फळेगांव ) यांच्या आशीर्वादाने व दिंडी चालक ह.भ.प.पंडीत महाराज लोणे ( नडगांव ) यांच्या कुशल नेतृत्वाने टाल मृदुंगाच्या निनादात हरिनाम जय घोष करत दिंडीचे प्रस्थान गुरूवार दिनांक ८जानेवारी २०२६रोजी सायंकाळी ६वाजता मढ तालुका शहापूर येथून होणार आहे.

## आमदार कथोरेंच्या फोटोवरून मुरबाड नगरपंचायत मध्ये वादंग

### भाजपाच्या आजी माजी नगरसेवकांनी फोटो लावून दिला आंदोलनाचा ईशारा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**मुरबाड :** मुरबाड नगरपंचायत मधील नगराध्यक्षांच्या दालनातील फोटो नाट्य क्षमण्याची चिन्हे दिसत नसून आमदार किसन कथोरे व खासदार बाळ्या मामा म्हात्रे यांचा मंगळवारी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतिने लावण्यात आलेल्या फोटोपैकी बुधवारी पून्हा किसन कथोरे यांचा फोटो हटविण्यात आल्याने संतप्त झालेल्या भाजपाचे माजी नगराध्यक्ष मोहन सासे,मुकेश विशे, किसन कथोरे, नगरसेविका मधुरा सासे, मानसी देसले, मनोज देसले, आर. पी.आयचे दिनेश उघडे, माजी नगरसेवक रविंद्र देसले यांनी कार्यकर्त्यासह नगराध्यक्षांच्या बंद दालनाचा दरवाजा उघडून आमदार कथोरेंचा फोटो पून्हा लावण्यात आला असून यापुढे आम्ही लावण्यात आलेला फोटो जर काढण्यात आला तर नगरपंचायत विरोधात मोठे आंदोलन केले जाईल असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

दरम्यान या फोटोचा वाद शमण्याची चिन्हे दिसत नसून नगरपंचायत स्थापने पासून लावण्यात आलेला फोटोची आत्ताच का अडचण होत आहे,एका लोकप्रतिनिधीचा हा जाणून बुजून केलेला अपमान आहे तो खपवून घेणार नाही असा संतप्त ईशारा यावेळी माजी नगराध्यक्ष मोहन सासे यांनी दिला आहे.यासंबधीत तशा प्रकारचे निवेदनही लोकक्रांती सामाजिक संघटनेचे अध्यक्ष नरेश मोरे यांच्या वतिने मुरबाड पोलीसांना देण्यात आले आहे.

यावेळी अतुल देशमुख,सागर कार्ले, रमेश देसले,महेश जाधव,जगदिश पष्टे,भूषण भानुशाली,योगेश चोधरी,विनोद मोरे, गुरू खोलांबे,संजय खोलंबे,जितेंद्र पंडीत, प्रथमेश जाधव,जय शेलार,सामाजिक कार्यकर्ते भिमराव भोईर, गणेश खंडागळे यांच्यासह मोठ्या संख्येने भाजपा, रिपाईचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## डॉ. किशोर पाटील यांना 'बाळशास्त्री जांभेकर प्रेरणा पत्रकारिता पुरस्कार'

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी:**चंद्रानंद कृषीपणन व समाजकल्याण संस्था, ठाणे जिल्हा यांच्या वतीने दै. स्वराज्य तोरणचे संपादक डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील यांना पत्रकारितेतील त्यांच्या प्रदीर्घ, निष्ठावान व समाजाभिमुख कार्याची दखल घेत 'बाळशास्त्री जांभेकर प्रेरणा पत्रकारिता पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. हा सन्मान रविवार, दि. ४ जानेवारी २०२६ रोजी कैलासनगर, वळपाडा येथील पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. श्री. यशवंत अनंत म्हात्रे यांच्या शुभहस्ते, मान्यवर पाहुणे व शेकडो पत्रकारांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम ▯११,१११, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे होते. हा पुरस्कार विशेष व आकर्षक असून समाजहित जपणाऱ्या मूल्याधिष्ठित



पत्रकारितेचा सन्मान असल्याची माहिती डॉ. श्री. यशवंत अनंत म्हात्रे यांनी दैनिक स्वराज्य तोरण व अन्य प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. डॉ. किशोर बळीराम पाटील यांनी गेल्या तीन दशकांहून अधिक काळ पत्रकारितेच्या क्षेत्रात भिवंडी शहर, ग्रामीण भागासह संपूर्ण महाराष्ट्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. समाजातील वंचित, दुर्लक्षित घटकांचे प्रश्न, स्थानिक समस्या, शेतकरी, कष्टकरी व सामान्य माणसांचा आवाज त्यांनी सातत्याने शासन-प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले आहे. गेल्या १८ वर्षांपासून दैनिक स्वराज्य तोरणचे संपादक म्हणून त्यांनी आपली जबाबदारी समर्थपणे पार पाडली आहे. विशेष म्हणजे आगरी समाजातून महाराष्ट्रातील एकमेव मराठी दैनिकाचे संपादक म्हणून त्यांनी समाजाला वैचारिक दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. निर्भीड लेखनशैली, सामाजिक बांधिलकी व सत्यनिष्ठ पत्रकारिता ही त्यांच्या कार्याची ठळक ओळख ठरली आहे. तसेच पत्रकारांच्या हितासाठी नेहमीच पुढाकार घेऊन त्यांना मदतीचा हात देत योग्य सहकार्य करणारे संपादक म्हणूनही डॉ. किशोर पाटील यांची ओळख आहे. पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त दिला जाणारा हा पुरस्कार म्हणजे सत्य, निडरता व समाजहित जपणाऱ्या पत्रकारितेचा गौरव असल्याचे मत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. डॉ. किशोर पाटील यांची ही निवड युवा पत्रकारांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास संस्थापक अध्यक्ष डॉ. श्री. यशवंत अनंत म्हात्रे यांनी यावेळी व्यक्त केला. या पुरस्कार वितरण सोहळ्यामुळे स्थानिक पत्रकारिता व सामाजिक कार्याला नवी ऊर्जा मिळेल, अशी प्रतिक्रिया विविध स्तरांतून उमटत आहे.

# रायगड : ग्रामपंचायतींच्या घरपट्टी वसुलीत ३ महिन्यात ९०.७७ कोटी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. त्याचा परिपाक म्हणूनच जिह्यातील ग्रामपंचायतींच्या घरपट्टी वसुलीत या अभियानादरम्यान लक्षणीय वाढ झाली आहे. ऑगस्ट ते डिसेंबर 2025 या तीन महिन्यांच्या कालावधीत ग्रामपंचायतींची तब्बल 90 कोटी 77 लाखांची वसुली आहे. या वसुलीमुळे ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होणार आहे.

रायगड जिल्ह्यात शासनाच्या समृद्ध पंचायत राज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची घरपट्टीची मोठी थकबाकी राहिल्याने या अभियानांतर्गत थकबाकी भरणासाठी ग्रामपंचायतींतर्फे विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.



ग्रामपंचायतींना सोमवारी व शनिवारी असे दोन दिवस घरपट्टी भरणासाठी कॅम्प आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे समृद्ध पंचायत राज अभियानाच्या कालावधीत घरपट्टीवर 50 टक्के सुट शासनातर्फे देण्यात आली. या सवलतीचा लोभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेउन अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला. अभियान कालावधीतच 13 डिसेंबर राजी आयोजिक करण्यात आलेल्या लोकअदालतीमुळे अनेक प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. या लोकअदालतीमध्ये जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकडून घरपट्टीची एकूण 27 हजार 341 प्रकरणे ठेवण्यात आली. यातील 8 हजार 316 प्रकरणांचा निपणारा करून 6 कोटी 80 80 लाख 14 हजार 963 रुपयांची घरपट्टी वसूल होण्यास मदत झाली.

**...यामुळे झाली घरपट्टी वसुलीत वाढः**

- **समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत घरपट्टी वसुलीसाठी सोमवार व शनिवारी विशेष कॅम्पचे आयोजन**
- **घरपट्टी करावर 50 टक्के सवलत**
- **लोकअदालतीत ठेवलेल्या प्रकरणांचा तातडीने निपटारा**
- **जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतींकडून ऑनलाईन पेमेंटची सुविधा**

> **जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकडून एप्रिल ते डिसेंबर 2025 या कालावधीत तब्बल 62 टक्के घरपट्टी वसुली करण्यात आली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानामुळे घरपट्टी वसुलीला गती मिळाली आहे. हे अर्थिक वर्ष संपेपर्यंत म्हणजे पुढील तीन महिन्यात ही वसुली 90 टक्क्यांपर्यंत करण्याचा आमचा मानस आहे. त्याप्रमाणे ग्रामपंचायतींनाही सूचना देण्यात आल्या आहेत. ग्रामस्थांनीही ग्रामपंचायतींना घरपट्टी भरून सहकार्य करावे.**
>
> **- नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड, जिल्हा परिषद**

रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यावर विशेष भर दिला जात आहे. वाढीव घरपट्टी वसुलीमुळे ग्रामपंचायतींना मूलभूत सुविधा, विकासकामे व लोकहिताच्या योजना अधिक प्रभावीपणे राबविता येणार आहे.

पाणीपट्टी वसुलीतही एप्रिल ते डिसेंबर 2025 दरम्यान 50.56 टक्के वसुली झाली असून समृद्ध पंचायत राज अभियानादरम्यान सुमारे 9 कोटींची वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे लोकअदालतीमध्ये पाणीपट्टीची 6 हजार 689 प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यातील 1 हजार 474 प्रकरणांचा निपटारा झाला असून 1 कोटी 14 लाख 41 हजार 550 रुपयांची वसुली झाली आहे.

## भविष्यवेध



रविवार
११ जानेवारी २०२६

**मेष**
तुमचा बहुतेक वेळ तुमच्या मुलांसोबत घालवाल. तुम्ही त्यांच्यासोबत मॉलमध्ये खरेदीलाही जाऊ शकता. घरी अचानक नातेवाईक येण्याची शक्यता आहे.

**वृषभ**
तुम्ही मित्रांसोबत बाहेर जाऊ शकता. आज तुमचा व्यवसाय दुप्पट होईल, ज्यामुळे आर्थिक परिस्थिती सुधारेल. आजचा दिवस फायदेशीर असेल.

**मिथुन**
चांगले उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. संगीत क्षेत्रात काम करणाऱ्यांना आज चित्रपट उद्योगात गाण्याची ऑफर मिळू शकते. यश निश्चित मिळेल.

**कर्क**
जोडीदाराला खूश करण्यासाठी बाहेर फिरायला जायचा प्लान आखू शकता. वरिष्ठांशी शक्य तितकी सल्लामसलत केल्यानंतरच कोणतेही काम सुरू करा.

**सिंह**
तुम्ही अनेक महत्त्वाचे निर्णय घ्याल. व्यावसायिकांसाठी हा दिवस शुभ आहे. तुमच्या ऑफिसमध्ये गणेशमूर्ती ठेवल्याने मोठा करार मिळू शकतो.

**कन्या**
तुम्ही कामासाठी नवीन योजना आखायचा प्रयत्न कराल. पण त्यात यश मिळू शकते. प्रामाणिकपणामुळे जोडीदाराचा आणि कुटुंबाचा प्रेम मिळेल.

**तुळ**
मैत्रीपूर्ण वागण्यामुळे तुम्हाला यश मिळू शकते. तुम्हाला उत्सुकतेची भावना देखील वाटू शकते. तुम्ही इतरांची मदत कराल, समाधान मिळेल.

**वृश्चिक**
अडकलेले काम आज पूर्ण होईल. सरकारी कार्यालयात काम करणाऱ्यांना पदोन्नती मिळू शकते. व्यवसायासाठी तुम्ही परदेशातही प्रवास करू शकता.

**धनु**
अनुभवी लोकांसोबत राहून तुम्हाला खूप काही शिकायला मिळेल. या राशीच्या महिला आज घरी कीर्तनाचे आयोजन देखील करू शकतात.

**मकर**
तुम्ही जे काम हाती घ्याल ते पूर्ण जबाबदारीने करा. आज बरेच लोक तुमची मदत घेऊ शकतात. पण त्यात तुमच्या तब्येतीकडे दुर्लक्ष करू नका.

**कुंभ**
लोकांना व्यवसाय वाढीसाठी नवीन मार्ग सापडतील. काळजीपूर्वक वाहन चालवा, अपघात होऊ शकतो. जोडीदाराच्या माहेरून चांगली बातमी येऊ शकते.

**मीन**
काम एकाग्रतेने करा आणि अर्धवट सोडू नका. मेहनतीचे योग्य फळ देखील तुम्हाला मिळेल. जमीन किंवा वाहन खरेदीशी संबंधित काम होऊ शकतं.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# महानगरपालिका निवडणूक 2026 :
# बहुसदस्यीय प्रभागात मतदान मार्गदर्शन

येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी राज्यात महानगरपालिका निवडणुकांचा रणसंग्राम होत आहे. यावर्षी मुंबई वगळता सर्व प्रमुख शहरांमध्ये 'बहुसदस्यीय प्रभाग पद्धत' (पॅनेल सिस्टीम) लागू करण्यात आली आहे. ही पद्धत अनेक मतदारांसाठी नवीन असल्याने, नेमके मतदान कसे करावे, याबाबत संभ्रम आहे. मतदारांची हीच अडचण दूर करण्यासाठी 'सजग नागरिक मंच नवी मुंबईच्या वतीने' मतदान कसे करावे याची माहिती देत आहोत .

**१) किती मते टाकायची?;**

प्रत्येक प्रभाग ४ सदस्यांचा असेल. ज्या महापालिकेत एकूण नगरसेवकांची संख्या ४ च्या पटीत नसेल त्या ठिकाणी एक प्रभाग ३ सदस्यांचा असणार आहे.

म्हणूनच : ४ सदस्यांचा प्रभाग ४ मते टाकणे आवश्यक, ३ सदस्यांचा प्रभाग ३ मते टाकणे आवश्यक.

प्रत्येक प्रभागामध्ये ४ सदस्य निवडायचे असतील ४ मते टाका

ज्या महानगरपालिकेत एकूण नगरसेवकांची संख्या ४ ने पूर्ण भागत नाही, तिथे एक प्रभाग ३ सदस्यांचा असेल ३ मते टाका म्हणजेच प्रभाग ४ सदस्यांचा असेल तर ४ मते, आणि ३ सदस्यांचा असेल तर ३ मते टाकणे अनिवार्य आहे.

प्रभागातील जागा साधारणपणे अ, ब, क, ड अशा नावांनी दाखवल्या जातात.

**२) EVM मशीन - रंगानुसार ओळख :**

उमेदवारांच्या संख्ये नुसार प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र ईव्हीएम मशीन असेल तर उमेदवारांची संख्या कमी असेल तर २ मशीनवरच ४ प्रभागांचे मतदान करता येऊ शकेल. प्रत्येक जागेसाठी वेगळ्या रंगाचे EVM मशीन असेल. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक मशीनवर फक्त एकच मत देता येईल.

अ जागा पांढरा रंग
ब जागा गुलाबी रंग
क जागा पिवळा रंग
ड जागा निळा रंग (ड फक्त ४ सदस्यांच्या प्रभागात)

**३) मतदान कसे करावे?**
**(Step-by-Step)**

1.ओळख तपासणी झाल्यावर अधिकारी तुम्हाला EVM कडे पाठवतील.
2. मतदान क्रम: अ ब क ड
3.प्रत्येक मशीनवर आपल्या आवडीच्या उमेदवारासमोरचे बटण दाबा, मतदान करताना मतदाराने हि बाब लक्षात ठेवावी की प्रत्येक प्रभागात मतदाराच्या इच्छेनुसार एकाच पक्षाला किंवा पसंत असणाऱ्या उमेदवारा नुसार वेगवेगळ्या पक्षाच्या उमेदवाराला मत देण्याचे स्वातंत्र्य असणार आहे. एकाच पक्षाला सर्व जागांची मते देणे बंधनकारक नाही इच्छेनुसार वेगवेगळ्या पक्षांना किंवा अपक्षांना स्वतंत्रपणे मत देऊ शकता.
4. बटण दाबल्यावर लाल दिवा (Red Light) लागेल याचा अर्थ मत नोंदले आहे.
5. शेवटच्या मशीनवर मतदान झाल्यावरच मोठा "बीप" आवाज येईल.

हा बीप म्हणजे तुमच्या सर्व मतांची नोंद पूर्ण झाली आहे.

**४) सर्व मशीनवर मतदान करणे बंधनकारक**

काही मतदान केंद्रांमध्ये ४ मशीनऐवजी फक्त २ मशीन असू शकतात.

तरीही तुम्हाला अ, ब, क, ड या सर्व जागांची मते देण्याची संधी मिळते.

बीप आवाज आला नाही म्हणजे मतदान पूर्ण झालेले नाही.

**५) प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र मतदान**
**(Split Voting)**
**मतदाराला पूर्ण स्वातंत्र्य आहे :**

सर्व मते एकाच पक्षाला देणे आवश्यक नाही तुम्हाला हवे असल्यास प्रत्येक जागेसाठी वेगवेगळ्या पक्षांच्या किंवा अपक्ष उमेदवारांना मत देऊ शकता

एक प्रभाग - एकच मत" अशी अट असणार आहे एकाच मशीनवर दोन बटणे (म्हणजेच एका जागेसाठी / एका वॉर्ड साठी) दाबता येत नाही

**६) कोणताही उमेदवार पसंत नसल्यास NOTA**

सर्व मशीनवर NOTA (None of the Above) पर्याय उपलब्ध आहे. जर विशिष्ट जागेसाठी कोणताही उमेदवार योग्य वाटत नसेल तर त्या मशीनवर NOTA दाबू शकता.

**७) सामान्य शंकांची सोपी उत्तरे**
**चारही मते द्यावी लागतात का?**

होय. प्रभाग ४ सदस्यांचा असेल तर ४ मते देणे आवश्यक.

**एकाच मशीनवर दोन बटणे दाबू शकतो का?**
**नाही.** एक मशीन = एकच मत

बीप आला नाही तर? मतदान पूर्ण झालेले नाही.

अजून एखादे मशीन राहिले आहे. चार जागांसाठी मतदान करणे अनिवार्य असल्याने जोवर ४ मते दिली जात नाहीत तोवर बीप असा मतदान पूर्ण केल्याचा आवाज येणार नाही.

**सर्व मते एकाच पक्षाला द्यावी लागतात का? नाही.**

मतदान करताना मतदाराने हि बाब लक्षात ठेवावी की प्रत्येक प्रभागात मतदाराच्या इच्छेनुसार एकाच पक्षाला किंवा पसंत असणाऱ्या उमेदवारा नुसार वेगवेगळ्या पक्षाच्या उमेदवाराला मत देण्याचे स्वातंत्र्य असणार आहे एकाच पक्षाला सर्व जागांची मते देणे बंधनकारक नाही इच्छेनुसार वेगवेगळ्या पक्षांना किंवा अपक्षांना स्वतंत्रपणे मत देऊ शकता.

**महत्वपूर्ण सूचना**

मतदान गोपनीय आहे कुणालाही तुम्ही कोणाला मत दिले ते सांगण्याची गरज नाही.
मतदान केंद्रात मोबाईल फोन वापरण्यास मनाई आहे.
रांगेत शांतता व शिस्त पाळावी,
मतदानापूर्वी प्रभागातील उमेदवारांची यादी एकदा नीट पाहून घ्या.
मतदान केंद्राबाहेर ही यादी बोर्डवर लावलेली असेल.

**सौजन्य :**
**सजग नागरिक मंच, नवी मुंबई**
**सुधीर दाणी - ९८६९२२६२७२ /**

**बातमीसाठी चौकटीत टाकण्यासाठी काही बुलेट पॉईट्स:**

**1) किती मते टाकायची?**

प्रभाग ४ सदस्यांचा मते अनिवार्य
. प्रभाग ३ सदस्यांचा (विशेष प्रसंगी) ३ मते अनिवार्य
प्रभागातील जागा : अ. ब. क. ड

**2) EVM ची रंगानुसार ओळख:**

प्रत्येक जागेसाठी वेगवेगळ्या रंगाचे मशीन
: अ- पांढरा रंग
ब- गुलावी रंग
क-पिवळा रंग
ड- निळा रंग (फक्त ४ सदस्यांच्या प्रभागात)
प्रत्येक मशीनवर फक्त 1 मत देता येते.
काही केंद्रांमध्ये उमेदवार कमी असल्यास ४ ऐवजी २ मशीन असू शकतात.

**3) मतदान प्रक्रिया - Step-by-Step**

अधिकारी ओळख तपासून EVMकडे पाठवतील.
मतदान क्रम: अब क ड
प्रत्येक मशीनवर आवडत्या उमेदवारासमोरील बटण दाबा
बटण दाबल्यानंतर लाल दिवा (Red Light) लागेल.
शेवटच्या मशीनवरील मतदानानंतर मोठा "बीप" आवाज येतो.
बीप सर्व मते नोंदली गेली

**4) सर्व मशीनवर मतदान करणे बंधनकारक**

३ किंवा ४ जागांपैकी एकही मशीन वगळता येत नाही
बीप आवाज आला नाही मतदान पूर्ण नाही

**5) Split Voting -** मतदाराला पूर्ण स्वातंत्र्य
सर्व मते एकाच पक्षाला देणे बंधनकारक नाही
प्रत्येक जागेसाठी वेगवेगळ्या पक्षांच्या / अपक्ष उमेदवारांना मत देता येते
एक मशीन एकच मत, दोन बटणे दाबणे मान्य नाही

**6) NOTA उपलब्ध**

प्रत्येक मशीनवर NOTA (None of the Above)
. योग्य उमेदवार नसेल तर त्या जागेसाठी NOTA निवडू शकता

**7) मतदारांच्या प्रमुख शंका- सोपे उत्तर**

चारही मते द्यावी का? होय (प्रभाग ४ सदस्यांचा असल्यास)
**एकाच मशीनवर दोन बटणे?** नाही, एकच मत
**बीप नाही आला?** मतदान पूर्ण आले नाही
सर्व मते एकाच पक्षाला द्यावी का? नाही, पूर्ण स्वातंत्र्य

**8) महत्वपूर्ण सूचना**

मतदान पूर्णतः गोपनीय
मतदान केंद्रात मोबाइल वापरास बंदी
रांगेत शिस्त व शांतता पाळा
मतदानापूर्वी प्रभागातील उमेदवारांची यादी पाहून घ्या
मतदान केंद्राबाहेर उमेदवारांची यादी बोर्डवर उपलब्ध असते.

**"जागरूक मतदार**
**- सक्षम लोकशाही!"**
**योग्य मतदान हेच शहराचे भविष्य बदलते. मतदान हा हक्कच नव्हे कर्तव्य आहे.**

## प्रताप परदेशी यांची शिवसेना कल्याण उपशहर प्रमुखपदी नियुक्ती



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : युवा शिवसैनिक तथा सामाजिक कार्यकर्ते प्रताप परदेशी यांची शिवसेना कल्याण उपशहर प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांनी ही नियुक्ती केली असून या निवडीसाठी शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी माजी नगरसेवक गणेश जाधव, विद्याधर भोईर आदी पदाधिकारी उपस्थित होते. तर पक्षाने दिलेली जवाबदारी योग्य रीतीने पार पाडून नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि पक्ष संघटना वाढीसाठी काम करणार असल्याचे यावेळी प्रताप परदेशी यांनी सांगितले.

## एमआयडीसी निवासी भागात महानगर गॅस 8 तास बंद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : डोंबिवली एमआयडीसी मध्ये रहिवाशी अनेक समस्येने त्रस्त आहेत. त्यात आज शनिवारी मिलापनगर निवासी परिसरातील काही ठिकाणी महानगर गॅस पुरवठा हा दुरुस्तीसाठी सकाळी दहा ते सायंकाळी सहा पर्यंत बंद राहणार असल्याचे महानगर गॅस कंपनीकडून नोटीस देऊन सांगण्यात आले. गेल्या वर्षभरात असे नोटीस देऊन किंवा अचानक गॅस गळती/दुर्घटना झाल्याने गॅस पुरवठा बंद राहण्याचे प्रकार अनेकदा झाले आहेत. त्यामुळे रहिवाशांना याचा फटका बसून त्यांना येथील पोळी भाजी केंद्रावर अवलंबून राहावे लागत आहे.

गॅस बरोबर वीज, पाणी पुरवठा असाच अनेकदा बंद राहत असल्याने येथील रहिवाशी त्रस्त झाले असून महापालिका निवडणूक आधी हा त्रास होत आहे तर निवडणूक झाल्यावर हा त्रास आणखी वाढेल की कमी होईल याबद्दल नागरिक द्विधा मनस्थितीत आहेत. महानगर गॅस आल्याने लोकांनी आपला गॅस सिलेंडर परत केला आहे. महानगर गॅस हा अधूनमधून बंद राहत असल्याने काहींनी विद्युत शेगड्या खरेदी केल्या आहेत. परंतु वीज पुरवठा बंद असेल तर त्याचा पण काही उपयोग होत नसल्याचे सामाजिक कार्यकर्ते राजू नलावडे यांनी सांगितले.

## ज्ञानेश्वरी ही संतांची जननी आहे

**- ह.भ.प. हरिदास शास्त्री पालवे**



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : वाचावी ज्ञानेश्वरी! डोळा पहावी पंढरी! ज्ञानेश्वरी ही भगवद्गीतेवरील सर्वोत्कृष्ट टीका असून मराठी सारस्वताचा अलंकार आहे. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या अद्वितीय प्रतिभेची परिपूर्ण अवस्था म्हणजे ज्ञानेश्वरी. ज्ञानेश्वरी ही संतांना जन्म देणारी ग्रंथमाता आहे. भगवान बाबांनी संपूर्ण ज्ञानेश्वरी कंठस्थ केली होती आणि तिचा समाजात व्यापक प्रचार केला. पाण्यावर बसून ज्ञानेश्वरी वाचनाची सिद्धीही भगवान बाबांना प्राप्त होती. येणाऱ्या पिढीत जर भगवान बाबांसारखे राष्ट्रसंत घडावेत तर ज्ञानेश्वरीला शरण जाणे आवश्यक आहे असे श्री संत वामनभाऊ व श्री संत भगवान बाबा यांचे पुण्यतिथी निमित्त आयोजित किर्तन सेवेमध्ये हभप डॉ. हरिदास महाराज पालवे शास्त्री यांनी ज्ञानेश्वरीचे महात्म्य प्रतिपादित करताना सांगितले.

श्री संत वामन भाऊ महाराज सेवा मंडळाचे वतीने दिनांक 4 जानेवारी ते 11 जानेवारी 2026 रोजी आई माता मंदिर, मीनाताई ठाकरे गार्डनच्या बाजूला, कोरस रोड, सावरकर नगर, ठाणे येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

पुढे बोलताना हभप पालवे महाराज म्हणाले की भारतीय संस्कृती महान व वैज्ञानिक असून संस्कृती ग्रंथाला जन्म देते, आणि ग्रंथ संतांना जन्म देतात असे प्रतिपादन करताना भगवान बाबांची ज्ञानेश्वरी कंठस्थ होती तर वामनभाऊ महाराजांची गाथा पूर्णपणे स्मरणात होती. अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षणाचे महत्त्व आणि समाजाला प्रकाश देण्याची शिकवण भाऊ–बाबांनी समाजाला दिली.

यावेळी श्री संत वामनभाऊ महाराज सेवा मंडळाचे अध्यक्ष शशिकांत दौंड, उपाध्यक्ष बाबासाहेब वाघ, खजिनदार बाबासाहेब आंधळे, कार्याध्यक्ष शिवाजी जायभाये, सचिव भूषण भांगे सह परिसरातील भावीभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुळगाव-बदलापूर नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी प्रियंका दामले यांची निवड

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर** : कुळगाव-बदलापूर नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादी (अजित पवार) च्या प्रियंका दामले यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे नगरपालिकेत राष्ट्रवादी आणि भाजप यांची सत्ता अधिक मजबूत झाली आहे. कुळगाव बदलापूर नगरपालिकेत नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष महिला विराजमान झाल्या आहेत. शुक्रवारी पालिकेच्या सभागृहात उपनगराध्यक्ष पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. विरोधकांनी उमेदवारी अर्ज दाखल न केल्याने दामले यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

## पेरियार विद्यापीठाच्या कुलपतींकडून ऐरोलीतील आंबेडकर ज्ञानस्मारकाचे कौतुक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई** : नवी मुंबई महानगरपालिकेचे ऐरोली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानस्मारक हे बाबासाहेबांच्या प्रेरणादायी विचारांना व्यापक अवकाश उपलब्ध करुन देणारे स्मारक म्हणून देशा-परदेशातील नामवंतांकडून तसेच नागरिकांकडून नावाजले जात आहे. स्मारकाला दररोज मोठया संख्येने नागरिक व पर्यटक भेट देत असतात.



तामिळनाडू येथील पेरियार मणियम्मई विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेचे (अभिमत विद्यापीठ) कुलपती डॉ. के. वीरमणी यांनी स्मारकाला भेट देत येथील वैविध्यपूर्ण दालनांचे, त्याच्या मांडणीचे व त्यामध्ये जपलेल्या कलात्मकतेचे मनापासून कौतुक केले. स्मारकातील समृध्द ग्रंथालय हा अभ्यासकांसाठी माहिती व ज्ञानाचा खजिना असून येथील दुर्मीळ छायाचित्र संग्रहालयातील बाबासाहेबांचे जीवन चरित्र पाहून भारावून गेलो असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

महत्वाचे म्हणजे हे स्मारक अत्यंत विचारपूर्वक डिझाईन केलेले, सुव्यवस्थित आकर्षक मांडणी असलेले आणि शैक्षणिकदृष्ट्या प्रभावी असल्याचे असल्याचे ते म्हणाले. त्यांनी असेही निरीक्षण नोंदविले की, हे स्मारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन, घटनात्मक दृष्टी आणि सामाजिक न्यायाचा संदेश प्रत्येक माणसापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे महत्वाचे काम करते तसेच वर्तमानातील व भावी पिढ्यांना संवेदनशील बनविण्यात महत्वाची भूमिका बजावतांना दिसते.

या भेटीदरम्यान कुलपती डॉ. के. वीरमणी यांनी स्मारकाविषयीच्या भावना आणि सदिच्छा अंतःकरणापासून असल्याचे सांगत यामधून आयुक्तांची दूरदृष्टी आणि समतेची मूल्ये जपण्याची वचनबद्धता दिसून येते असे मत व्यक्त केले. त्यांनी स्मारकासोबत संयुक्त उपक्रम आणि कार्यक्रमांद्वारे शैक्षणिक आणि विद्यापीठीय सहकार्य वाढवण्याची इच्छाही व्यक्त केली.

## अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल मुंबई विद्यापीठाला कांस्यपदक

### संघात एस.एस.टी.कॉलेजच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : मुंबई विद्यापीठाने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल स्पर्धेत प्रथमच कांस्यपदक जिंकत क्रीडा इतिहासात नवा अध्याय लिहिला आहे. या ऐतिहासिक यशामध्ये एस.एस.टी. कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सचे विद्यार्थी अजय खेडकर आणि शंतनू सुरवे यांनी उत्कृष्ट खेळ सादर करत मोलाचा वाटा उचलला.

बेसबॉलच्या आंतर विद्यापीठीय स्तरावर मुंबई विद्यापीठाला मिळालेले हे पहिलेच पदक असल्याने या यशाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या स्पर्धेत एस.एस.टी. कॉलेजच्या खेळाडूंनी दाखवलेली जिद्द, शिस्त आणि संघभावना कौतुकास्पद ठरली. या यशाला आणखी मानाची झळाळी मिळाली असून अजय खेडकर याची मुंबई विद्यापीठाच्या बेसबॉल संघाच्या कर्णधारपदी निवड झाली होती. त्याच्या सक्षम नेतृत्वाखाली संघाने उल्लेखनीय कामगिरी करत कांस्यपदक निश्चित केले.

या उल्लेखनीय यशाबद्दल मुंबई विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी, एस.एस.टी. कॉलेजचे प्राचार्य डॉ. पुरस्वानी, आयक्यूएसी समन्वयक डॉ. खुशबू पुरस्वानी, तसेच सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. राहुल अकुल आणि प्रा. पुष्कर पवार यांच्या मार्गदर्शनाखालीच हे यश संपादन झाल्याचे त्यांनी नमूद केले.

## काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे हजारो कार्यकर्त्यांसह पक्षांतर करणार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर आता जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत डी.वाय. फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष दयानंद चोरघे यांचा पक्ष प्रवेश होणार असल्याचे निश्चित झाले आहे, मात्र ते कोणत्या पक्षात जाणार काही दिवसानंतर सांगितले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.



नगरपरिषदेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी झालेल्या मतभेदानंतर दयानंद चोरघे यांनी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता, त्यानंतर ते कोणत्या पक्षात जातील याबाबत जिल्ह्यात चर्चा होती, मात्र त्यांनी कोणत्याही पक्षात थेट प्रवेश न घेता "वेट अँड वॉच" ची भूमिका घेतली.आता त्यांनी लवकरच पक्ष प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले असून भिवंडी,शहापूर,मुरबाड,कल्याण बदलापूर,अंबरनाथ व पालघर जिल्ह्यातील वाडा या भागातील माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, माजी सभापती, माजी उपसभापती, आजी माजी सरपंच,उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्यांसह पक्षातील आजी-माजी पदाधिकारी तसेच सामाजिक संघटनांचे पदाधिकारी यांच्यासह सुमारे पाच हजारांहून अधिक कार्यकर्त्यांना घेऊन त्यांचा पक्ष प्रवेश होणार आहे,त्यासाठी त्यांनी भिवंडी येथे जाहीर मेळावा घेण्याचे ठरवले असून या मेळाव्यातच त्यांचा पक्षप्रवेश होणार आहे. ते कोणत्या पक्षात जाणार याबाबत त्यांना विचारले असता जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत पक्षप्रवेश होणार लवकरच कोणत्या पक्षात जाईल याबाबत पत्रकार परिषद घेऊन जाहीर करेल असे त्यांनी सांगितले आहे.दयानंद चोरघे मोठी फौज घेऊन पक्षप्रवेश करणार असल्याने ते ज्या पक्षांमध्ये जातील त्या पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणात वाढणार आहे असल्याची चर्चा ठाणे जिल्हा ग्रामीण मध्ये सुरू झाली आहे.चोरघे यांनी काँग्रेस जिल्हाध्यक्ष पदाचा राजिनामा दिल्याने सध्या काँग्रेस पक्षाची अवस्था अत्यंत बिकट झाल्याचे चित्र दिसत आहे.दयानंद चोरघे हे कोणत्या पक्षात जाणार हे गुलदस्त्यात असल्याने त्यांचे समर्थकांना मध्ये मोठी चर्चा सुरू झाली आहे.

## दबाव, खोटी आश्वासने व पैशांच्या आमिषाला बळी पडू नका – विजय साळवी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते विजय साळवी यांनी मतदारांशी संवाद साधला आहे. सत्ताधार्यांच्या दबावाला, खोट्या आश्वासनांना आणि पैशांच्या आमिषाला बळी पडू नका असे आवाहन त्यांनी केले आहे.

२०१४ - २०१५ नंतर तब्बल १२ वर्षांनंतर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची निवडणूक होत आहे. २०२० पासून कोरोना महामारी सुरु झाली. त्यावेळी मुख्यमंत्री असलेले उद्धव ठाकरे यांनी कुटुंब प्रमुखाप्रमाणे सर्वांना आधार देऊन कोरोना प्रतीबंधत्माक उपाययोजना राबवली. झोपडपट्टी भागात, धारावी भागात कोरोनाचा शिरकाव होऊ दिला नाही. यामुळे उद्धव ठाकरे यांना उत्कृष्ट मुख्यमंत्री म्हणून गौरविण्यात आले. मात्र त्यांना काही लोकांनी मुख्यमंत्री पदावरून पाय उतार केले. अनेकांनी मेहनतीने रक्ताचे पाणी करून वाढवलेली शिवसेना भाजपाच्या दबावामुळे दोन भागात विभागून मराठी माणसाची ताकद कमी केली.

आता महापालिका निवडणुकीत उन्मत सत्ता व पैसा विरुद्ध सर्वसामान्य निष्ठावान कार्यकर्ते असा लढा होणार आहे. या उन्मत सत्तेच्या आणि पैशांच्या जोरावर अनेकांना माघार घ्यायला लावली. लोकांना मतदान करून लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी समोर विरोधी पक्षांच्या उमेदवारच ठेवला नाही. २० ठिकाणी बिनविरोध निवड करत लोकशाहीचा खून केला. ज्यांनी हा प्रस्ताव धुडकारला त्यांना पैसा व सरकारी यंत्रणेचा वापर करून पराभूत करण्याचा प्रकार सुरु आहे. हि लोकशाहीची थट्टा असून सामान्य मतदारांच्या हक्कावर घाला आहे. त्यामुळे सत्ताधार्यांच्या दबावाला, खोट्या आश्वासनांना आणि पैशांच्या आमिषाला बळी पडू नका असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते विजय साळवी यांनी केले आहे.

ठाणे ■ रविवार
११ जानेवारी २०२६
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
पान ४

# बंडखोरी करणाऱ्या गायकर दाम्पत्याची भाजपा पक्षातून हकालपट्टी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना भाजपा आरपीआय आणि इतर पक्षांची महायुती झाली आहे. युती धर्माचे पालन निवडणुकीत करण्याच्या सूचना दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार दोन्ही पक्षातील अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्यास सांगण्यात आले. मात्र तरी देखील कल्याण मधील प्रभाग क्र. ५ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या साधना गायकर यांनी आपली अपक्ष उमेदवारी कायम ठेवत महायुतीच्या उमेदवारां विरोधात प्रचार सुरु ठेवला आहे. याची दखल भारतीय जनता पार्टीने घेऊन भाजपा जिल्हाध्यक्ष नंदू परब यांनी साधना गायकर आणि त्यांचे पती रवी गायकर यांची पक्षविरोधी कारवाई केल्याबद्दल भाजपा पक्षातून हकालपट्टी केली आहे. याबाबतचे पत्र परब यांनी प्रसिद्धीमाध्यमांना दिले आहे.

# आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ साठी पहिला टप्पा सुरू

## शाळा नोंदणी व पडताळणी सुरुवात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**




**ठाणे** : शिक्षण हक्क कायदा (Right to Education – RTE) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना खासगी विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठीच्या प्रवेश प्रक्रियेचा पहिला टप्पा शुक्रवार, दिनांक ९ जानेवारी, २०२६ पासून सुरू करण्यात आला आहे.

या पहिल्या टप्प्यात आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांची ऑनलाईन नोंदणी तसेच शाळा पडताळणी (School Verification) करण्यासाठी संबंधित संकेतस्थळावरील लिंक कार्यान्वित करण्यात आली आहे.

शाळा पडताळणी करताना विशेष काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, बंद करण्यात आलेल्या शाळा, अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शाळा, अनधिकृत शाळा तसेच स्थलांतरित (Relocated) झालेल्या शाळा या आरटीई कायद्यानुसार २५ टक्के प्रवेशासाठी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये प्रविष्ट करण्यात येणार नाहीत, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच, शाळांना ज्या शिक्षण मंडळाची (Board) मान्यता आहे, तेच मंडळ शाळेने नोंदणी करताना निवडले आहे का, याची काटेकोर तपासणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. कोणत्याही प्रकारची चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती नोंदवली जाणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

दि. ९ जानेवारी ते १९ जानेवारी २०२६ या कालावधीत सर्व विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांनी आपली नोंदणी व शाळा पडताळणीची प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद ठाणे बाळासाहेब राक्षे यांनी दिले आहेत.

या संदर्भातील सूचना सर्व महापालिकांचे शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी तसेच पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांना देण्यात आल्या असून, आरटीई प्रवेश प्रक्रिया पारदर्शक, अचूक आणि वेळेत पूर्ण होण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ही समाजातील दुर्बल घटकातील बालकांना दर्जेदार शिक्षण व समान संधी मिळण्यासाठी राबविण्यात येत आहे .संबंधित शाळा प्रशासनाने या बाबत गांभीर्याने दिलेल्या वेळेत कार्यवाही करावी असेही शिक्षण विभागामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

# आकाशातील गमती जमती नेस्टचा स्तुत्य उपक्रम



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाडा** : ८ जानेवारी म्हणजे गॅलेलियो गॅलिली एक इटालियन खगोलशास्त्रज्ञ याचा स्मृतिदिन. ज्याने कोपर्निकसच्या सूर्यकेंद्रीय विश्वाच्या सिद्धांताला पुष्टी देत गतीशास्त्राची एक विज्ञान शाखा म्हणून उभारणी केली. अशा या महान खगोल अभ्यासकाच्या स्मृतीनिमित्त वाडा, ऐनशेत परिसरातील मुलांना खगोल शास्त्राचा परिचय म्हणून 'आकाशातील गमती जमती' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात 'दिसणारे' आकाश कसे बघायचे ? यासाठी नेस्ट (Nature education and studies team) या गटा मार्फत एक सत्र ऐनशेत येथे आयोजित करण्यात आले होते. आकाश निरीक्षणात सध्या डोळ्यांनी दिसणारी काही नक्षत्रे (अश्विनी, भरणी, कृतिका, रोहिणी, मृगशीर्ष) त्याचबरोबर सध्या रात्रभर दिसणारा गुरु ग्रह यांची ओळख करून दिली. त्याचबरोबर तारे व ग्रह कसे ओळखायचे? याची माहिती दिली. प्रत्यक्ष निरीक्षणाच्या वेळी आकाशातून जाणारे अनेक कृत्रिम उपग्रह पाहून मुलं हरखून गेली. रात्रीच्या वेळी दिसणारं आकाश किती खिळवून ठेवतं याचा अनुभव मुलांसाठी मजेशीर होता. आपण कुठे जात असताना चंद्र आपल्या मागे मागे आल्यासारखा का वाटतो? यांसारखे कुतूहलापोटी मनात तयार झालेले प्रश्न मुलांनी विचारले. वाडा व ऐनशेत गावातील मुलांनी या उपक्रमात चांगला सहभाग नोंदविला. या आकाश निरीक्षण अभ्यासाची यापुढे आणखी चार ते पाच सत्रं मार्च महिन्यापर्यंत करायची असा मानस नेस्टचे सदस्यांचा आहे. जेणेकरून या सत्रात सहभागी होणाऱ्या मुलांना या विषयाची चांगली ओळख होईल.

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यंत्रणा मतदानासाठी सज्ज

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**




**भिवंडी** : मा.आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्री. अनमोल सागर (भा.प्र.से.) यांचे नेतृत्वाखाली भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका दिनांक 15 जानेवारी, 2026 रोजी होणाऱ्या महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूककरिता सज्ज झाली असून, मतदान व मतमोजणी प्रक्रियेकरिता आवश्यक ती सर्व तयारी जवळपास पुर्ण झाली आहे. मतदानासाठी 820 Control Unit व 1640 Ballot Unit ची तपासणी व सिलींगचे काम पुर्ण करण्यात आले आहे. महानगरपालिकेने एकूण 750 मतदान केंद्र तयार केले आहेत.

मतदारांना मतदानावेळी सावली मंडप, पिण्याचे पाण्याची व्यवस्था तसेच ज्येष्ठ नागरीक व दिव्यांग यांचेकरिता डोली व व्हिलचेअरची देखील व्यवस्था करण्यात आली आहे. मतदान केंद्र असलेल्या इमारतींमध्ये मुख्य वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत प्रथमोपचार पेटीची व्यवस्था करण्यात आली असून, आशा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात एक वैद्यकीय पथक, अँब्युलससह तैनात करण्यात आले आहे. शहरामध्ये मुस्लीमबहुल भागातील मतदान केंद्रावर पर्दानशीन महिला मतदारांची ओळख पटविण्यासाठी 350 महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मा. अतिरीक्त आयुक्त-1 तथा आचारसंहिता पथकाचे नोडल अधिकारी श्री. विठ्ठल डाके यांचे अधिपत्याखाली सहा. आचारसंहिता पथक प्रमुख श्री. समीर जवरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी आतापर्यंत दोन प्रकरणांमध्ये एकूण रक्कम रुपये 12,65,900/- इतकी रोख रक्कम जप्त केली असून, आचारसंहिता भंगाचे 6 गुन्हे दाखल केले आहेत. तसेच, आचारसंहिता पथक निवडणूक प्रचारादरम्यान कुठेही आचारसंहितेचा भंग होणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष ठेवून आहे.

मा. अतिरीक्त आयुक्त-2 तथा मनुष्यबळ व्यवस्थापन प्रमुख श्रीमती नयना ससाणे व मा. उपायुक्त निवडणूक श्री. विक्रम दराडे यांचे मार्गदर्शनाखाली मनुष्यबळ विभागाचे श्री. विनोद मनोरे, श्री. प्रशांत बयास, श्री. कल्याण जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी या निवडणूकीकरिता एकूण 4500 कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. निवडणूककामी 100 क्षेत्रीय अधिकाऱ्यांचीदेखील नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्व कर्मचाऱ्यांना दिनांक 25 व 26 डिसेंबर, 2025 रोजी पहिले तसेच जे कर्मचारी पहिल्या प्रशिक्षणास गैरहजर होते त्यांना दिनांक 30.12.2025 रोजी प्रशिक्षण देण्यात आले आहे. तर, दिनांक 6 व 7 जानेवारी, 2026 रोजी दुसरे प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्रथम प्रशिक्षणास गैरहजर असणाऱ्या 1009 कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्यात आल्याने पुढील प्रशिक्षणास मोठ्याप्रमाणात उपस्थिती आढळून आली. दि. 30.12.25 च्या प्रशिक्षणास गैरहजर असणाऱ्या 285 कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. मतदान केंद्रावर नियुक्त 268 महिला कर्मचारी या अन्य शहरातून येणार असल्याने त्यांच्या निवासाची व्यवस्था देखील महानगरपालिकेने केली आहे.

तसेच, शाळा क्र. 22/62 येथे खास महिलांकरिता पिंक (गुलाबी) बुथ तर दांडेकर शाळेत एक मॉडेल बुथ देखील तयार करण्यात येणार आहे.

# जिल्हा परिषदेत महायुतीच्या विजयाचा म्हसा यात्रेतील स्नेहभोजनात निर्धार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : म्हसा यात्रेनिमित्ताने माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी आयोजित केलेल्या स्नेहभोजनात जिल्हा परिषदेच्या आगामी निवडणुकीच्या रणनीतीबद्दल जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांनी चर्चा केली. तसेच श्री खांबलिंगेश्वराचा गजर करीत महायुतीच्या विजयाचा निर्धार करण्यात आला.

म्हसा येथील श्री खांबलिंगेश्वराच्या यात्रेनिमित्ताने दरवर्षी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्याकडून स्नेहभोजन कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. काल शुक्रवारी झालेल्या स्नेहभोजन कार्यक्रमाला शेकडो कार्यकर्ते व स्नेहीजनांची उपस्थिती होती. यानिमित्ताने नेते व कार्यकर्त्यांमध्ये मनमोकळा संवाद रंगला होता.

या वेळी सिडकोचे माजी अध्यक्ष प्रमोद हिंदुराव, भाजपाचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुभाष पवार, जयवंत सूर्यराव, सुभाष घरत, देवेश पाटील, मधुकर मोहपे,रामभाऊ बांगर, सुभाष हरड, दीपक खाटेघरे, हरेश खापरे, यांच्यासह मुरबाड, कल्याण, भिवंडी आणि शहापूर तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी व शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

जिल्हा परिषदेच्या सर्वच्या सर्व ५३ जागा जिंकून इतिहास घडविण्यासाठी एकत्र येऊन कार्य करावे, असे आवाहन कपिल पाटील यांनी कार्यकर्त्यांना केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा नियोजनबद्ध विकास करण्यात येत आहे. गेल्या ११ वर्षांच्या काळात केंद्र सरकारच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा कायापालट होत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी सन्मान योजनेतून शेतकऱ्यांना साह्य दिले जाते. तर महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबातील महिलांना हक्काचे पैसे मिळत आहेत. त्यातून अनेक महिलांनी स्वयंरोजगाराकडे समर्थपणे वाटचाल सुरू केली. शाश्वत पद्धतीने सुरू असलेल्या महायुतीच्या कार्याची परंपरा कायम ठेवण्यासाठी केंद्र, राज्याप्रमाणेच जिल्हा परिषदेतही भाजपा व महायुतीची सत्ता येण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन कपिल पाटील यांनी केले.या सभेत प्रमोद हिंदुराव, जितेंद्र डाकी, सुभाष पवार यांचीही भाषणे झाली. त्यांनी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतील रणनीतीबाबत मार्गदर्शन केले. या मेळाव्यात विविध कार्यकर्त्यांनी स्थानिक परिस्थितीबाबत माहिती दिली.

तत्पूर्वी, श्री खांबलिंगेश्वर मंदिरात जाऊन कपिल पाटील यांनी दर्शन घेतले. तसेच मनोभावे प्रार्थना केली. त्यानंतर म्हसा ग्रामपंचायतीच्या कार्यालयाला त्यांनी भेट दिली. त्यावेळी सरपंच जया घागस यांच्याकडून त्यांचा काठी व घोंगडी देऊन सन्मान करण्यात आला.

# सुबोध विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी साधला पोलिसांशी संवाद

## (विद्यार्थी रमले गप्पा आणि प्रात्यक्षिकात)



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : पेण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप बागुल सहायक पोलिस अधिकारी राजपूत, ठाणे अंमलदार आणि पोलिस कर्मचारी यांच्यासमवेत रेझिंग डे पोलिस वर्धापन दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना पोलिस अधिकारी भारावून गेले.

पेण येथील सुमतीबाई वि.देव सुबोध विद्यालय पेण येथील प्रशालेतील तिसरी इयत्तेतील १३० विद्यार्थ्यांना पोलिस अधिकारी राजपूत यांनी शस्त्र बंदूक कशी हाताळायची याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. याशिवाय पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांच्याशी विद्यार्थ्यांनी मनमोकळेपणाने संवाद हितगुज साधले. अनेक बाबींचे मजेशीर कुतूहल आणि बिनधास्तपणा पाहून पोलिसही भारावले. नव्या भारताची ही नवी पिढी निर्भीड बोल बरंच काही सांगून जाते. यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका अनिता घोडके, सहशिक्षिका प्रज्ञा कावतकर, अदिती कोत्रे, शिक्षक दुर्गेश वारगुडे, देवेंद्र नाईक यांनी हा शैक्षणिक उपक्रम मुलांसाठी पेण पोलिस ठाण्यात भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रफुल्लीत केले. यावेळी विद्यार्थ्यांनी आनंदाने आणि उत्साहाने कार्यक्रमात सहभाग घेतला. तसेच पोलिसांनी दाखवलेल्या प्रात्यक्षिकांमुळे मुलांच्या मनातील पोलिसांविषयी असलेली भीती नाहीशी झाली. शालेय विद्यार्थ्यांनी या परिसर भेटीने आनंद व्यक्त करत शिक्षक वर्गाने ही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

# दिलीप बारटक्के यांच्या कार्यसेवक कार्य अहवालाचे उत्साहात प्रकाशन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**ठाणे** : ठाणे महापालिकेचे मा. नगरसेवक दिलीप बारटक्के यांच्या मागील नगरसेवक पदाच्या कारकिर्दीत केलेल्या कामांचा आढावा घेणाऱ्या कार्यसेवक असं समर्पक नाव असणाऱ्या कार्यअहवालाचे प्रकाशन प्रभाग क्र १४ मधील महायुतीचे बिनविरोध निवडून आलेल्या शीतल संतोष ढमाले, कांचन विजय चिंदरकर, राकेश विजय शिंदे आणि दिलीप चंद्रकांत बारटक्के आणि पदाधिकारी, कार्यकर्ते आदी मान्यवर यांच्या हस्ते उत्साहात झाले.

या कार्य अहवालात आजवर केलेल्या विकासकामांची ठळक नोंद वाचायला मिळणार आहे . उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार म्हाडा पांचपाखाडी ले आऊट अंतर्गत म्हाडा भाडेपट्टा नूतनीकरण शुल्क अभय योजना लागू केली. २०२२ पासून लीज बिलात एन चार्ज माफी मंजूर झाली. नागरिकांसाठी, बच्चे कंपनीसाठी उद्याने, ज्येष्ठ नागरिकांसाठी कट्टा, लोकमान्य बस डेपोचे नवीन बांधकाम, सुलभ शौचालयाचे लोकार्पण, गुरुवर्य आनंद दिघे साहेब यांच्या हस्ते यशोधन नगर नाक्याचे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक नामकरण, सव्वा लाख नागरिकांसाठी या वर्षी नवीन क्षमता असलेला जलकुंभ तयार होणार, निवासी महानगर गॅस पाइप लाइनचे उद्घाटन, गणपतीत कोकणात जाणाऱ्यांसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने मोफत ३२ एस टी बसेस सोडण्यात आल्या, कोरोना काळात नागरिकांच्या सुरक्षेसाठी मास्क, सानिटायझरचे मोठ्या प्रमाणात वाटप केले. बारटक्के फाऊंडेशनची थक्क करणारी कामगिरी. भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते उद्घाटन, बेरोजगारांना नोकरी फाऊंडेशनच्या वतीने मोफत नेत्र तपासणी, जागतिक महिला दिनानिमित्त शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना महिला आघाडी, युवती सेना व बारटक्के फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने कर्तबगार महिलांचा गौरव. म्हणूनच हा कार्य अहवाल तुमच्या हाती देताना मला खूप आनंद होत आहे असे दिलीप बारटक्के यांनी म्हटले आहे.

# ठाणे : १४ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे ;** ठाणे जिल्हा न्यायालय व तालुका न्यायालयांमध्ये शनिवार, दि. १४ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालत आयोजित करण्यात आली आहे. धनादेश अनादर, बँक कर्जवसूली, कामगार वाद, मोटार अपघात नुकसानभरपाई, वैवाहिक वाद, कर वसुली, विद्युत व पाणी देयक, महसूल तसेच इतर तडजोड पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे लोकअदालतीत ठेवता येणार आहेत. मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. श्रीनिवास ब्रि. अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली ही लोकअदालत होणार असून, प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणांचा जलद व सामोपचाराने निपटारा करण्याची संधी पक्षकारांना मिळणार आहे. लोकअदालतीतील निर्णय अंतिम असून अपील नसते, तसेच कोर्ट फी परत मिळते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. रविंद्र एस. पाजणकर यांनी नागरिकांना या लोकअदालतीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.




# उमेदीतून ग्रामीण महिलांना 'लखपती दीदी' घडविण्याचे निर्देश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**ठाणे** : मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे दि. ०६ जानेवारी, २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ठाणे विभागाची आढावा बैठक यशस्वीपणे संपन्न झाली. या बैठकीत अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी, प्रगती व पुढील नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, जिल्हा अभियान व्यवस्थापक, लेखाधिकारी, जिल्हा व्यवस्थापक- सामाजिक समावेशन, संस्था व क्षमता बांधणी, कार्यालयीन अधीक्षक, जिल्हा व्यवस्थापक – विपणन, जिल्हा व्यवस्थापक – आर्थिक समावेशन तसेच अंबरनाथ, कल्याण, मुरबाड, भिवंडी व शहापूर तालुका अभियान कक्षातील तालुका अभियान व्यवस्थापक, तालुका व्यवस्थापक व प्रभाग समन्वयक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत जिल्हा व तालुकास्तरीय कर्मचारी माहिती, संस्थीय बांधणी, प्रवर्गनिहाय कुटुंब समावेश, खेळते भांडवल, समुदाय गुंतवणूक निधी, जोखीम प्रवणता निधी, बँक पतपुरवठा, विमा संरक्षण, वैयक्तिक बँक कर्ज तसेच उपजीविका वृद्धीच्या विविध उपक्रमांचा सखोल आढावा घेण्यात आला. यामध्ये औजार बँक, उत्पादक गट निधी वितरण, एंटरप्रायझेस, परसबाग, लखपती दीदी उपक्रम, उद्योग आधार, फूड लायसन्स, PMFME अंतर्गत Seed Capital व ३५ टक्के अनुदान, Smart FPC, ऑनलाईन उत्पादने, 'वन स्टेशन वन प्रॉडक्ट', SVEP, MED आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आर्थिक वर्षे २०२४-२५ मध्ये एकूण ४५८४४ लखपती दीदी उद्दिष्टे होते त्यापैकी ४७७३२ महिला लखपती झाल्या. या आर्थिक वर्षात एकूण ४२१७६ लखपती दीदी उद्दिष्टे आहे त्यापैकी डिसेंबर २०२५ अखेर एकूण ७२५२ महिला लखपती झालेल्या आहेत. ठाणे जिल्ह्यात आतापर्यंत एकूण ५४३८३ महिला लखपती झालेल्या आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांचे आर्थिक सबलीकरण, स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे तसेच बचत गटांच्या माध्यमातून शाश्वत उपजीविका उभारण्यावर भर देण्याच्या सूचना दिल्या. तसेच सर्व तालुक्यांनी उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने समन्वयाने काम करून योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या. या बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांनी आपल्या विभागातील प्रगती अहवाल सादर करून अडचणी व उपाययोजनांबाबत चर्चा केली. अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हा व तालुकास्तरावर अधिक प्रभावी नियोजन व काटेकोर पाठपुरावा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024